सामना

# मीरा-भाईंदरमध्ये पहिलीच हरित इमारत

## ▌परिसर नो स्मोकिंग घोषित

भाईंदर, दि. १६ (सा.वा.) – शहरातील मेडिटेशन सेंटर इमारतीला हरित इमारत म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्रदूषण कमी करण्याबरोबरच पाणी बचत, ४३ टक्के क्षेत्रावर स्थानिक प्रजातीची झाडे तसेच अनेक पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी नवीन बांधकामे करताना हरित इमारत संकल्पनेतूनच विकास करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत महापालिकेने मेडिटेशन इमारतीचे बांधकाम केले आहे. या इमारतीत वेगाने वाढणाऱ्या झाडांसह ४३ टक्के क्षेत्रावर स्थानिक प्रजातीची वृक्षलागवड करण्यात आली आहे. तसेच लॅण्डस्केपिंगही केले आहे. पाणी बचतीसाठी वॉशरूम, टॉयलेटमध्ये ड्युअल फ्लश व युरिनलसाठी प्रेसमॅटिक फ्लश तसेच अन्य व्यवस्था केली आहे. त्यातून २०.४९ टक्के पाण्याची बचत झाली आहे. इमारतीचे छप्पर बांधण्यासाठी इन्सुलेटिंग सामग्रीचा वापर केल्याने ४० टक्के विहिरीची बचत झाली आहे. सुका आणि ओल्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी इमारतीच्या आवारात विलगीकरण डबे बसवण्यात आले आहेत. हा परिसर नो स्मोकिंग झोन करण्यात आला असून तसे सूचना फलक लावण्यात आले आहे. विशेष म्हणजे येथे इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग व्यवस्था करण्यात आली आहे. तळ अधिक एक मजला असलेल्या मेडिटेशन सेंटरमध्ये बहुउद्देशीय सभागृह, वाचनालय अशा सुविधा आहेत.

Mumbai Edition
Feb 17, 2023 Page No. 6